बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

Marketing and Publicity
Head Office
cmmedia@mahabank.co.in; agmmkt@mahabank.co.in

**प्रसिद्धीसाठी**

# बँक ऑफ महाराष्ट्रच्या कर्मचाऱ्यांकडून पीएम केअर्स कोषासाठी 5 कोटी रुपये देणगी

**पुणे**, **एप्रिल 17**, **2020 :** सार्वजनिक क्षेत्रातील अग्रणी, बँक ऑफ महाराष्ट्रने पीएम केयर्स (प्रधान मंत्री नागरिक सहायता आणि आणीबाणीच्या परिस्थितीतील दिलासा कोष) कोषासाठी कोरोना संक्रमण आटोक्यात आणण्याकरिता रुपये 5 कोटी रक्कम देणगी स्वरुपात दिली आहे. पीएम केअर्स फंडासाठी कर्मचारी-अधिकाऱ्यांनी दिलेले हे अंशदान शतकाहूनही अधिक काळानंतर जगातील सर्वात मोठी कोरोना महामारी साथीच्या संक्रमण विरोधात लढण्यासाठी आहे.

भारत सरकारने बँक ऑफ महाराष्ट्राला सुद्धा पीएम केअर्स कोषासाठी देणगी जमा करण्यासाठी नामांकित केले आहे. पीएम केअर्स कोषामध्ये देणगी देण्यासाठी आरटीजीएस, एनईएफटी, आयएमपीएस अथवा पीएम केअर्स फंड या नावे काढलेले धनादेश आणि डिमांड ड्राफ्टद्वारे योगदान दिले जाऊ शकते.

बँक ऑफ महाराष्ट्र कोविड -19 महामारी विरोधात पुकारलेल्या या युद्धामध्ये अग्रस्थानी असून आमच्या 1800 पेक्षा अधिक शाखा तसेच 1850 एटीएम्सच्या माध्यमातून अखंडित वित्तीय सेवा पुरवीत आहोत. याशिवाय आमचे बँक-मित्र / बँकिंग-प्रतीनिधी (बँकिंग करस्पॉन्डन्स) देशामध्ये 3000 विविध ठिकाणी वित्तीय सेवा पुरवत आहेत.

बँक लॉकडाऊन दरम्यानच्या कालावधीत व्यवहारासाठी ग्राहक शाखेमध्ये आल्यास त्यांना सॅनिटायझर्स देणे आणि सामाजिक अंतर राखणे यासारख्या काळजीवाहू उपाययोजना करत बँकिंग सेवा देत आहे.

बँकेच्या देशभरातील सर्व 32 विभागीय कार्यालयांच्या माध्यमातून कोरोना योद्ध्यांना पाठिंबा देण्यासाठी चेहऱ्यावरील मास्क, ग्लोव्हज, कॅनोपी छत्र्या, पाण्याच्या बाटल्या, अन्नाची पाकिटे, किराणा सामान इत्यादी साहित्य वितरित करण्याचे उपक्रम बँकेद्वारे घेतले गेले आहेत.

बँक ह्या कोविड -19 महामारी दरम्यान कर्तव्य बजावत असलेलेल्या आपल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या पाठीशी उभी असून त्यांना आवश्यक मदत तसेच आर्थिक स्वरूपातही प्रोत्साहन देत आहे.